# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापन मंडळ )**



एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३२० E-mail Id – coegondwana@gmail.com


जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/२१०४/२०२० दि. २६/०६/२०२०

## परिपत्रक

**शैक्षणिक सत्र २०१९–२० मधील अंतिम सत्र/वर्षाच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षांचे सुधारीत प्रपत्र व परीक्षा आवेदन पत्राबाबत**

संदर्भ:– १)मा. उच्च शिक्षण संचालक,पुणे यांचे शासन पत्र क्र. संकीर्ण युएनआय/४१३१,दि. ०८ मे २०२०
२)विद्यापीठाचे परीपत्रक क्र. जा.क्र गो.वि/परीक्षा वि. /१९८३/२०२० दि.१९मे, २०२०
३)मा. उच्च शिक्षण संचालक,पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/२०२०बैठक विशी–१/४४४५,दि.१९जून २०२०
४)उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र १२३/विशि–३, मंत्रालय मुबंई–३२ दि.१९ जून २०२०
५) जा.क्र./गों.वि/परीक्षा विभाग/२१५५/२०२०, दिनांक २०/०६/२०२०.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठाचे विभाग प्रमूख व संबंधित विद्यार्थ्यांना याव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ४ नूसार परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभागाव्दारे दिनांक २०/०६/२०२० रोजी गों.वि/परीक्षा विभाग/२१५५/२०२० यानूसार अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे. सदर अधिसुचनेतील 'प्रपत्र अ' व 'प्रपत्र ब' मध्ये सुधारणा करण्यात आलेली असून सुधारीत प्रारूप संलग्नित केलेले आहे. यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी प्रपत्र भरून दिलेले आहे त्यांनी पुन्हा नव्याने भरून देण्याची आवश्यकता नाही मात्र ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा निवडी संदर्भात बदल करावयाचा असेल अशा विद्यार्थ्यांनी नव्याने प्रपत्र भरून आपल्या महाविद्यालयामध्ये दिनांक ०४/०७/२०२० पर्यंत जमा करावे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदन पत्र सादर करता आले नाही अशा सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक ०४/०७/२०२० पुर्वी परीक्षा आवेदन पत्रे महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे सादर करावी तद्नंतर कुठल्याही परिस्थितीत परीक्षा आवेदन पत्र स्विकारल्या जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सहपत्र:–१) सुधारीत प्रपत्र–'अ'
२) सुधारीत प्रपत्र–'ब'

दि. 26/6/2020

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सुधारीत प्रपत्र

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
## परीक्षा व मुल्यमापण मडंळ

### प्रपत्र—अ

मी (विद्यार्थ्याचे नाव)———————————————————————————— महाविद्यालयाचे नाव————————— येथे——————————या अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक सत्र २०१९—२० मध्ये अंतीम सत्रामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून शिकत असून माझा बैठक क्रमांक——————— व पीआरएन क्र.—————————————— आहे.

मी मागील सर्व सत्रातील सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असून सद्यस्थितीत कोव्हीड—१९ मुळे निर्माण झालेल्या परीस्थितीमुळे आरोग्य विषयक जोखमीची मला जाणीव आहे. मागील संपुर्ण सत्रातील ५०% सरासरी गुण व महाविद्यालयामार्फत मिळालेल्या अंतर्गत गुणाच्या ५०% गुण या आधारे अंतीम सत्राच्या परीक्षेचा निकाल घोषीत करण्यात येणार आहे व हया पध्दतीने परीक्षा न देता माझ्या अंतीम सत्राच्या परीक्षेचा निकाल घोषीत करण्यात यावा.

विद्यार्थ्याचा सध्याचा पुर्ण पत्ता

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

टिप:१) सदर प्रपत्र ऑनलाईन/ ऑफलाईन पध्दतीने भरून विद्यार्थ्याने शिकत असलेल्या महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावे.

२) एकदा भरलेले प्रपत्र कोणत्याही परिस्थितीत बदलविता येणार नाही यांची नोंद घ्यावी.

सुधारीत प्रपत्र

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
## परीक्षा व मुल्यमापण मडंळ

### प्रपत्र—ब

मी (विद्यार्थ्याचे नाव)————————————————————————————————————————

महाविद्यालयाचे नाव——————————————————————————————येथे——————————————या अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक सत्र २०१९—२० मध्ये अंतीम सत्रामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून शिकत असून माझा बैठक क्रमांक—————————— व पीआरएन क्र.—————————————————— आहे.

मी मागील सर्व सत्रातील सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असून सद्यस्थितीत कोव्हीड—१९ मुळे निर्माण झालेल्या परीस्थितीमुळे आरोग्य विषयक जोखमीची मला जाणीव आहे. मागील संपुर्ण सत्रातील ५०% सरासरी गुण व महाविद्यालयामार्फत मिळालेल्या अंतर्गत गुणाच्या ५०% गुण या आधारे अंतीम सत्राच्या परीक्षेचा निकाल घोषीत करण्यात येणार आहे. मात्र तरीसुध्दा माझ्या पुढिल भविष्याचा विचार करून मला अंतीम सत्राची परीक्षा दयावयाची आहे.

विद्यार्थ्याचा सध्याचा पुर्ण पत्ता

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

टिप:१) सदर प्रपत्र ऑनलाईन/ ऑफलाईन पध्दतीने भरून विद्यार्थ्याने शिकत असलेल्या महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावे.

२) एकदा भरलेले प्रपत्र कोणत्याही परिस्थितीत बदलविता येणार नाही यांची नोंद घ्यावी.